• वर्ष : ०४ • अंक : ०१३ • पुणे • मंगळवार, दि. २२ सप्टेंबर २०२६ • मराठी दैनिक •पाने ४ •किंमत : २ रूपये •RNI No.-MAHMAR/2023/89313

दैनिक आरंभपर्व

आरंभ एका नव्या पर्वाचा

Epaper : www.aparv.com

1,22,570

डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे

पुण्यातील लोकप्रिय दैनिक





एस. एस. नगरकर ज्वेलर्सच्या भव्य दालनाचे उद्घाटन 3





डीपीजीयूमध्ये करिअर एक्स्पो २०२६चे आयोजन 4

## ठळक बातम्या

### मिशोचा शेअर सुसाट; ११०% रिटर्न

पुणे (आरंभ पर्व) : भारतीय शेअर बाजारात घसरण होत असतानाच ई-कॉमर्स कंपनी Meesho च्या शेअरमध्ये मात्र मंगळवारी जोरदार तेजी पाहायला मिळाली. BSE वर इंट्राडे व्यवहारात Meesho चा शेअर तब्बल 6 टक्क्यांनी वाढून ₹232.90 वर पोहोचला. कंपनीच्या व्यवसायाबाबत सकारात्मक अंदाज आणि मजबूत ट्रेडिंग व्हॉल्यूममुळे शेअरमध्ये खरेदीचा उत्साह दिसून आला. Meesho ने 10 डिसेंबर 2025 रोजी शेअर बाजारात लिस्टिंग केली होती. कंपनीचा IPO ₹111 प्रति शेअर या किमतीवर आला होता. त्याच्या तुलनेत सध्याचा शेअर भाव सुमारे 110 टक्क्यांनी अधिक आहे. सकाळी 11:04 वाजता Meesho चा शेअर 6.70 टक्क्यांनी वाढून ₹233.83 वर पोहोचला होता. NSE आणि BSE मिळून सुमारे 1.54 कोटी Meesho शेअर्सची खरेदी-विक्री झाली. दरम्यान, शेअरचा मागील 52 आठवड्यांचा उच्चांक ₹254.65, तर नीचांक ₹125.56 आहे.

### टाटा समूहातील वाद चिघळला

पुणे (आरंभ पर्व) : टाटा समूहाच्या अध्यक्षपदी एन. चंद्रशेखरन (नटराजन चंद्रशेखरन) यांच्या फेरनिवडीवरुन सध्या प्रचंड वाद रंगला आहे. टाटा सन्सच्या संचालक मंडळाने एन. चंद्रशेखरन यांची पुढील 5 वर्षांच्या कार्यकाळासाठी चेअरमन पदावर निवड करण्याचा प्रस्ताव मंजूर केला होता. मात्र, टाटा सन्समधील सर्वाधिक भागधारक असलेल्या टाटा ट्रस्टनं हा निर्णय बेकायदेशीर असल्याचे सांगत याला विरोध दर्शविला आहे. एन. चंद्रशेखरन यांच्या फेरनियुक्तीला नोएल टाटा यांचा प्रखर विरोध आहे. टाटा सन्सच्या बोर्डाच्या बैठकीत झालेल्या 4-1 मतदानाला काही कायदेशीर अर्थ नाही कारण कंपनीच्या नियमानुसार चेअरमन नियुक्तीसाठी टाटा ट्रस्टनं नामनिर्देशित केलेल्या संचालकाची सहमती अनिवार्य आहे, जी पूर्ण झालेली नाही, असे टाटा सन्सचे म्हणणे आहे. या सगळ्यामुळे हा वाद चिघळला असतानाच आता यावर देशाच्या राजकारणातील बुजुर्ग आणि अनुभवी नेते, तसेच उद्योग व अर्थकारणाची जाण असलेला नेता म्हणून ओळख असलेल्या शरद पवार यांनी भाष्य केले आहे. शरद पवार यांनी सोशल मीडियावर एक पोस्ट लिहून यावर भाष्य केले आहे. टाटा समूहाचा वारसा जपणे ही काळाची गरज असल्याचे मत शरद पवार यांनी व्यक्त केले आहे.

### दारुच्या नशेत भावाचा काटा काढला

जळगाव (आरंभ पर्व) : जळगाव जिल्ह्यातील भडगाव परिसरात क्रूरतेची परिसीमा गाठणारी एक अत्यंत सुन्न करणारी घटना समोर आली आहे. अवघ्या 800 रुपयांच्या क्षुल्लक वादातून आत्ते भावानेच आपल्या मामे भावाचा दगडाने ठेचून काटा काढला आहे. धर्मा जुगा पवार असे मृत तरुणाचे नाव असून, जुगा कांतिलाल पवार असे संशयित आरोपीचे नाव आहे.

# पुण्यात बंदिस्त देखाव्यांसमोर गर्दीचा स्फोट

## गणेशोत्सवातील गर्दीने पुणेकर धास्तावले; 'दुर्घटना होण्याची वाट बघायची का?'; रस्तेबंदीचा फेरविचार आवश्यक

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

गणेशोत्सवातील देखावे आणि गणरायाच्या दर्शनासाठी मध्यवर्ती पुण्यात मोठ्या संख्येने भाविक दाखल होत असताना गर्दी व्यवस्थापनाचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत आहे. बंदिस्त देखावे, अरुंद प्रवेशमार्ग, रस्त्यांवरील बॅरिकेडिंग, अस्ताव्यस्त पार्किंग आणि वाढती पादचारी गर्दी यामुळे नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर १८ ते २५ सप्टेंबरदरम्यान मध्यवर्ती पुण्यातील अनेक प्रमुख मार्गांवर वाहतुकीत बदल करण्यात आले आहेत. गर्दी वाढल्यास काही मार्ग तात्पुरते बंद करून वाहतूक पर्यायी मार्गाने वळविण्याचीही तरतूद करण्यात आली आहे. मात्र, प्रत्यक्षात काही ठिकाणी रस्ते बंद झाल्याने स्थानिक नागरिक, पादचारी, व्यापारी आणि भाविक यांची मोठी गैरसोय होत असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत.



पुण्यातील अनेक गणेश मंडळांचे भव्य आणि बंदिस्त देखावे भाविकांचे आकर्षण ठरत आहेत. मात्र, मर्यादित प्रवेशमार्गामुळे नागरिकांना रांगेत दीर्घकाळ थांबावे लागत आहे. काही ठिकाणी प्रवेश आणि बाहेर पडण्याचे मार्ग अरुंद असल्याने गर्दी एकाच ठिकाणी साचते. पादत्राणे ठेवण्याच्या ठिकाणीही गर्दी वाढत असल्याने परिस्थिती अधिक बिकट होऊ शकते, अशी नागरिकांची भावना आहे.

गर्दीच्या ठिकाणी लहान मुले, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांची विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. गर्दी नियंत्रणासाठी केवळ पोलिस बंदोबस्त पुरेसा नसून मंडळांचे स्वयंसेवक, महापालिका कर्मचारी आणि वाहतूक पोलिस यांच्यात प्रत्यक्ष समन्वय असणे गरजेचे आहे. सदाशिव पेठेतील सिद्धार्थ बेंद्रे यांनी सांगितले की, गर्दी मोठ्या प्रमाणावर असली तरी केवळ प्रशासनाला दोष देणे योग्य नाही. अतिउत्साह, सेल्फी काढण्यासाठी होणारी गर्दी आणि स्वयंशिस्तीचा अभाव यामुळेही कोंडीत भर पडते. दुर्घटना घडल्यानंतर उपाययोजना करण्यापेक्षा त्याआधीच नागरिकांनी आणि प्रशासनाने खबरदारी घेणे आवश्यक आहे.

गर्दीच्या ठिकाणी नागरिकांनी स्वतःची सुरक्षितता लक्षात घेऊन संयम पाळणे, लहान मुले व ज्येष्ठ नागरिकांना अतिगर्दीच्या ठिकाणी नेणे टाळणे आणि पोलिसांच्या सूचनांचे पालन करणे गरजेचे आहे.

गर्दी नियंत्रणासाठी रस्ते बंद करणे हा एक उपाय असू शकतो; मात्र सरसकट रस्तेबंदीमुळे स्थानिक नागरिक आणि अत्यावश्यक सेवांनाही अडचणी निर्माण होऊ शकतात. यापूर्वी नागरिकांनी रुग्णवाहिका, स्थानिक रहिवासी आणि विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र मार्ग ठेवण्याची मागणी केली आहे.

विशेषतः रुग्णालये, दवाखाने आणि आपत्कालीन सेवांच्या मार्गांवर कोणत्याही परिस्थितीत अडथळा निर्माण होणार नाही, याची काळजी घेणे आवश्यक आहे. गणेशोत्सव हा पुण्याच्या सांस्कृतिक परंपरेचा महत्त्वाचा भाग आहे. त्यामुळे उत्सवाचा उत्साह कायम ठेवतानाच सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य मिळणे आवश्यक आहे. मंडळांनी देखाव्यांचे प्रवेश आणि निर्गमन मार्ग स्पष्ट ठेवावेत, स्वयंसेवकांची पुरेशी नियुक्ती करावी, गर्दी एका ठिकाणी साचणार नाही याची काळजी घ्यावी आणि आपत्कालीन मार्ग मोकळे ठेवावेत.


### दुर्घटनेनंतर नव्हे, आधीच जागे व्हा!

गणेशोत्सवातील गर्दी ही पुण्याच्या उत्सवाची भव्यता दर्शवते; परंतु हीच गर्दी सुरक्षितपणे हाताळण्यात यंत्रणा अपयशी ठरली तर त्याचे गंभीर परिणाम होऊ शकतात. त्यामुळे 'दुर्घटना होण्याची वाट बघायची का?' हा नागरिकांचा सवाल गांभीर्याने घेण्याची गरज आहे. पोलिस, महापालिका, वाहतूक विभाग, गणेश मंडळे आणि नागरिक यांनी एकत्रितपणे गर्दीचे नियोजन केले, तर उत्सवाचा आनंदही कायम राहील आणि सुरक्षिततेची हमीही मिळू शकेल. गर्दी वाढणार हे निश्चित आहे; प्रश्न एवढाच की, तिचे नियोजन आपण आधी करणार की दुर्घटनेनंतर?

## पदवीधर-शिक्षक मतदारसंघासाठी मतदानाची तारीख ठरली

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

महाराष्ट्रातील विधानपरिषदेच्या पाच जागांसाठी निवडणुकीची घोषणा केंद्रीय निवडणूक आयोगाने केली आहे. तीन पदवीधर आणि दोन शिक्षक मतदारसंघांचा यात समावेश असून, २३ ऑक्टोबर रोजी मतदान होणार आहे. २७ ऑक्टोबर रोजी मतमोजणी होऊन निकाल जाहीर केला जाणार आहे. या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया 29 सप्टेंबरपासून सुरू होणार आहे. निवडणुकीची घोषणा झाल्याने संबंधित मतदारसंघांमध्ये राजकीय हालचालींना वेग येण्याची शक्यता आहे. महाराष्ट्रातील पाच विधानपरिषद सदस्यांचा कार्यकाळ संपत असल्याने या जागांसाठी निवडणूक होत आहे. यात औरंगाबाद पदवीधर मतदारसंघाचे सतीश चव्हाण, पुणे पदवीधर मतदारसंघाचे अरुण लाड, नागपूर पदवीधर मतदारसंघाचे



अभिजीत वंजारी, अमरावती शिक्षक मतदारसंघाचे किरण सरनाईक आणि पुणे शिक्षक मतदारसंघाचे जयंत आसगावकर यांचा समावेश आहे. या पाचही जागांसाठी आता नव्याने निवडणूक प्रक्रिया पार पडणार असून, विविध पक्षांकडून उमेदवारांची चाचपणी सुरू होण्याची शक्यता आहे. महाराष्ट्रासोबत बिहार, कर्नाटक आणि उत्तर प्रदेशातील विधानपरिषदेच्या जागांसाठीही निवडणूक जाहीर करण्यात आली आहे. बिहारमध्ये आठ, कर्नाटकात चार, तर उत्तर प्रदेशात ११ विधानपरिषद जागांसाठी मतदान होणार आहे.

## भूसंपादनाआधीच निविदा अन् कामाचेही आदेश!

### इंद्रायणी नदीसुधार प्रकल्पाच्या निविदेवरून पिंपरी महापालिका प्रशासन तोंडघशी

**पिंपरी (दै. आरंभ पर्व)**

महापालिकेने इंद्रायणी नदीसुधार प्रकल्प हाती घेतला; मात्र, नियोजनाआधीच निविदा आणि कामाचे आदेश देण्यात आल्याचा प्रकार पुढे आला आहे. सुमारे ४३० कोटी ७५ लाख रुपयांच्या प्रकल्पासाठी आवश्यक बहुतांश जागा महापालिकेच्या ताब्यात नसताना कंत्राटदाराला कामाचे आदेश देण्यात आले. आता नदीकाठी भूसंपादनासाठी प्रशासनाने हालचाली सुरू केल्या आहेत. यामुळे अधिकारी व सल्लागारांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

महापालिका हद्दीतील इंद्रायणी नदीच्या सुमारे १८.५० किलोमीटर लांबीच्या एका बाजूचा विकास या प्रकल्पातून केला जाणार आहे. दुसऱ्या बाजूचा विकास 'पीएमआरडीए'कडून होणार आहे. प्रकल्पाच्या खर्चाला





स्थायी समितीने १ जुलैला मान्यता दिली होती. आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर भूमिपूजनाचे नियोजन असल्याने प्रस्तावाला घाईने मंजुरी देण्यात आल्याची चर्चा होती.

अतिवृष्टीमुळे भूमिपूजनाचा कार्यक्रम रद्द झाला; मात्र, त्यानंतर निविदेतील प्रक्रियेनुसार कंत्राटदाराला कामाचे आदेश देण्यात आले. दरम्यान, नदीकाठच्या मंजूर विकास योजनेतील आरक्षणांसह बाह्य प्रस्तावातील जागा भूसंपादनाने घेण्याचा प्रस्ताव बुधवारी (ता. २३) स्थायी समितीपुढे मंजुरीसाठी येणार आहे. त्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांकडे प्रस्ताव पाठविण्यासाठी महापालिका सर्वसाधारण सभेची मान्यता घ्यावी लागणार आहे. प्रत्यक्षात तळवडे, चिखली, बोऱ्हाडेवाडी, मोशी, डुडुळगाव आणि चऱ्होली बुद्रुक येथील नदीकाठच्या जागा प्रकल्पासाठी आवश्यक आहेत. त्यांपैकी अनेक जागा अद्याप महापालिकेच्या ताब्यात आलेल्या नाहीत. तसेच, कामाच्या मार्गात येणाऱ्या जुन्या वृक्षांबाबत उद्यान व वृक्षसंवर्धन विभागाची आवश्यक परवानगीही मिळालेली नसल्याची माहिती आहे. जागा ताब्यात घेणे, परवानग्या मिळविणे आणि प्रत्यक्ष कामाचे नियोजन या बाबी आधी पूर्ण होणे अपेक्षित असताना निविदेची प्रक्रिया पुढे गेल्याने प्रशासन अडचणीत आले आहे.

### प्रकल्पातील ठळक बाबी

- इंद्रायणी नदीसुधार प्रकल्प केंद्र शासनाच्या 'अमृत २.०' अभियानांतर्गत राबवण्याचे नियोजन
- राज्य शासनाच्या तांत्रिक मान्यतेनुसार तो दोन वर्षांत पूर्ण करणे बंधनकारक
- प्रत्यक्ष काम सुरू झाल्यानंतर शासनाकडून २०, ४० आणि ४० टक्के अशा तीन टप्प्यांत निधी मिळणार
- जागा, परवानग्या किंवा कामातील विलंबामुळे प्रकल्प रखडल्यास निधीच्या वितरणावर परिणाम होण्याची शक्यता

# सिरम कंपनीच्या २२ उत्कृष्ट कामगारांचा सत्कार

**लोणी काळभोर (दै. आरंभ पर्व)**

सिरम कंपनीतील कामगार तसेच त्यांच्या कुटुंबीयांमध्ये आपुलकीचे आणि आनंदाचे वातावरण निर्माण व्हावे, यासाठी सिरम कंपनीच्या वतीने स्नेहमेळाव्याचे आयोजन करण्यात आले. या स्नेहमेळाव्यास कामगार व त्यांच्या कुटुंबीयांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कंपनीचे चेअरमन डॉ. सायरस पुनावाला ,कंपनीचे सीईओ आदर पुनावाला हे कंपनीतील कामगारांच्या प्रति नेहमीच अग्रेसर असुन त्यांनी दरवर्षी राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमाचे कामगार प्रतिनिधी ,कामगार व त्यांच्या कुटुंबायांनी कौतुक करुन आभार मानले.

यावेळी कामगारांनी वर्षभर कंपनीच्या प्रगतीसाठी केलेल्या योगदानाचे कौतुक करण्यात आले. कामाच्या धावपळीतून काही काळ दूर जात कामगारांनी आपल्या कुटुंबीयांसोबत आनंदाचे क्षण अनुभवले. तसेच विविध उपक्रमांमुळे मेळाव्यात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. दरवर्षी सिरम कंपनी दहावी व बारावीच्या परिक्षेत ८०% टक्के गुण



मिळविलेल्या कामगारांच्या मुलांना प्रोत्साहन म्हणून दहा हजार रुपये, मिठाई व भेट वस्तु देण्यात येते. यामुळे मुलांना अतिशय आंनद होतो. यावर्षी आपल्या कामगार बांधव

कंपनी आणि कामगार यांच्यातील संबंध अधिक दृढ व्हावेत, तसेच कामगारांच्या कुटुंबीयांनाही कंपनीच्या परिवाराचा एक भाग असल्याची भावना निर्माण व्हावी,तसेच निवृत्त झालेल्या कामगारांना आपण जरी निवृत्त झालो तरी सतत कंपनीशी जोडले असल्याची भावना निर्माण व्हावी या उद्देशाने या स्नेहमेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आलेल्या कामगारांच्या कुटुंबियांना बसने कंपनी दाखवून माहिती देण्यात आली. तसेच दुपारच्या वेळी आलेल्यांना जेवण देण्यात आले. कामगारांच्या कुटुंबियांनी कंपनी बघितल्या नंतर सांगितले की आम्ही सिरम कंपनीशी जोडले गेलो याचा आम्हाला अभिमान वाटतो. दहावी व बारावीच्या १५४ मुलांना प्रोत्साहन पर भेट व बक्षीस देण्यात आले. तर या वर्षी निवृत्त झालेल्या २ कामगांराचा सन्मान करण्यात आला. कंपनीमध्ये उत्कृष्ट कामगिरी बजावणाऱ्या २२ कामगारांना 'उत्कृष्ट कामगार पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले. कंपनीच्या प्रगतीमध्ये महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या कामगारांच्या कार्याची दखल घेत हा सन्मान करण्यात आला. कामगारांनी आपल्या मेहनतीतून, शिस्तीतून आणि जबाबदारीने केलेल्या कार्यामुळे कंपनीच्या उत्पादनक्षमतेत व गुणवत्तेत भर पडत असल्याचे यावेळी मान्यवरांनी सांगितले.पुरस्कार वितरण कार्यक्रमास कंपनीचे अधिकारी, एचआर विभागाचे प्रमुख महेंद्र इंगे, सिनिअर जनरल मॅनेजर प्रविण गरकल, सिरम् एम्प्लॉईज युनियनचे संस्थापक अध्यक्ष सचिन तुपे, अध्यक्ष अजित भितांडे, उपाध्यक्ष अतुल कदम, सचिव अजित खैरे, खजिनदार सचिन गायकवाड, सदस्य प्रवीण घुले, गिरीश मोरे व सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

पुरस्कारामुळे कामगारांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, भविष्यातही उत्कृष्ट कामगिरी करण्यासाठी प्रेरणा मिळणार असल्याची भावना कामगारांनी व्यक्त केली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी कंपनीचे व्यवस्थापन, अधिकारी व कामगार प्रतिनिधींनी विशेष परिश्रम घेतले.



# पदपथांवरील कचऱ्याचे नियोजन हवे!

**पुणे शहराची ओळख शिक्षण, संस्कृती आणि ऐतिहासिक वारसा असलेल्या शहराची आहे. मात्र, शहरातील अनेक पदपथांची अवस्था पाहिली तर या ओळखीला गालबोट लागल्याचे दिसते. पदपथ नागरिकांच्या चालण्यासाठी असताना अनेक ठिकाणी त्यावर कचऱ्याचे ढीग, प्लास्टिकच्या पिशव्या, बांधकामाचे अवशेष आणि इतर टाकाऊ वस्तू पडलेल्या दिसतात. परिणामी पादचाऱ्यांना रस्त्यावरून चालण्याची वेळ येते आणि वाहतुकीच्या गर्दीत त्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होतो.**

संपादकाय

विचार आजचा... दिशा उद्याची...

कचरा व्यवस्थापनासाठी यंत्रणा असतानाही पदपथांवर कचरा साचत असेल, तर नियोजनातील त्रुटी स्पष्ट होतात. केवळ कचरा उचलणे हा यावरील कायमस्वरूपी उपाय नाही. कचरा कुठे निर्माण होतो, तो कुठे जमा केला जातो, किती वेळाने उचलला जातो आणि नागरिकांकडून त्याची विल्हेवाट कशी लावली जाते, याचा सर्वंकष विचार होणे आवश्यक आहे. शहरातील प्रमुख पदपथांवर आवश्यकतेनुसार स्वतंत्र कचराकुंड्या ठेवणे, ओला व सुका कचरा वेगळा करण्याची व्यवस्था करणे, नियमित स्वच्छता पथके नियुक्त करणे आणि कचरा उचलण्याचे वेळापत्रक काटेकोरपणे पाळणे गरजेचे आहे. बाजारपेठा, शाळा, महाविद्यालये, रुग्णालये, सार्वजनिक वाहतूक थांबे आणि गर्दीची ठिकाणे याठिकाणी विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. पदपथांवर व्यावसायिकांकडून किंवा नागरिकांकडून कचरा टाकला जात असल्यास त्यावर कारवाई झाली पाहिजे. मात्र, कारवाईसोबत पर्यायी व्यवस्था उपलब्ध करून देणेही प्रशासनाचे कर्तव्य आहे. कचराकुंडीच नसेल आणि नागरिकांनी कचरा कुठे टाकायचा, हा प्रश्न निर्माण होत असेल तर केवळ दंड करून समस्या सुटणार नाही. याशिवाय पदपथांवर अनधिकृत बांधकाम साहित्य, फलक, हातगाड्या किंवा इतर अडथळे ठेवणाऱ्यांवरही सातत्याने कारवाई होणे गरजेचे आहे. स्वच्छ आणि मोकळा पदपथ हा नागरिकांचा हक्क आहे. तो केवळ सौंदर्यीकरणाचा भाग नसून सुरक्षित पादचारी वाहतुकीसाठी आवश्यक पायाभूत सुविधा आहे. महापालिकेने प्रत्येक प्रभागातील पदपथांची पाहणी करून 'पदपथ स्वच्छता आणि कचरा व्यवस्थापन आराखडा' तयार करायला हवा. कोणत्या ठिकाणी किती कचरा निर्माण होतो, किती वेळा स्वच्छता आवश्यक आहे, कुठे कचराकुंडी हवी आणि कोणत्या ठिकाणी विशेष देखरेख आवश्यक आहे, याचे नियोजन केले पाहिजे. नागरिकांच्या तक्रारींसाठी प्रभावी यंत्रणा निर्माण करून तक्रारींचे वेळेत निराकरण होणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

पुणे हे केवळ मोठे शहर नाही; ते लाखो नागरिकांचे घर आहे. त्यामुळे शहर स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी प्रशासनाबरोबरच नागरिकांचीही आहे. कचरा रस्त्यावर किंवा पदपथावर न टाकणे, ओला-सुका कचरा वेगळा करणे आणि सार्वजनिक जागेची स्वच्छता राखणे, ही प्रत्येकाची जबाबदारी आहे.

**पुण्याला खऱ्या अर्थाने स्वच्छ, सुरक्षित आणि चालण्यायोग्य शहर बनवायचे असेल तर पदपथांकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. कचरा उचलण्याच्या तात्पुरत्या मोहिमांपेक्षा नियमित नियोजन, प्रभावी अंमलबजावणी आणि नागरिकांचा सहभाग यावर भर देण्याची वेळ आली आहे. पदपथ कचऱ्याचे ठिकाण नव्हे, तर नागरिकांच्या सुरक्षित वाटचालीचा मार्ग आहे. त्याचे नियोजन आणि संरक्षण आता प्राधान्याने झाले पाहिजे.**

# सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालय नामनिर्देशित सदस्यपदासाठी २० जणांचे अर्ज पात्र

- २१ सप्टेंबरला तीन नावे निश्चित होणार
- पर्वतीला एक तर खडकवासल्याला दोन संधी मिळण्याची चर्चा




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे महानगरपालिकेच्या सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालयांतर्गत नामनिर्देशित सदस्यपदासाठी दाखल झालेल्या अर्जांची छाननी पूर्ण झाली असून, एकूण २२ अर्जांपैकी २० अर्ज पात्र, तर २ अर्ज अपात्र ठरले आहेत. आता या प्रक्रियेतील पुढील महत्त्वाचा टप्पा २१ सप्टेंबर रोजी होणार असून, पात्र अर्जदारांमधून तीन सदस्यांची नावे निश्चित केली जाणार असल्याची माहिती आहे.

पात्र अर्जदारांमध्ये श्री. विलास पोकळे, सौरभ प्रमोद कदम, श्री. शहाजी वसंत वांजळे, श्री. तुषार श्रीहरी पोकळे, श्री. अनिल हिरामण घोडके, श्री. निखिल लक्ष्मण धावडे, श्री. संदीप उर्फ राजू चंद्रकांत कदम, रोहिणी संतोष राहाणे, श्री. सोमनाथ दत्तू साठे, श्री. अभिजित श्रीहरी धावडे, अरुण अनंता दांगट, ॲड. किरण सोमनाथ गायकवाड, सौ. कोमल सुशांत कुटे, श्री. गणेश तानाजी पोकळे, श्री. नितीन भिमराव गायकवाड, सौ. काजल किरण हागवणे, श्री. किरण गुलाब हागवणे, श्री. रमेश दिलीप गायकवाड, वृषाली विजय शेकदार आणि ॲड. किरण चंद्रकांत चव्हाण यांचा समावेश आहे. दरम्यान, नामनिर्देशित सदस्यांची निवड कार्यकर्त्यांमधून होणार असली, तरी भारतीय जनता पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांच्या निर्णयाला या प्रक्रियेत महत्त्व राहणार असल्याची चर्चा आहे. वरिष्ठ नेतृत्वाच्या आदेशानुसार पात्र उमेदवारांमधून तीन नावे अंतिम केली जाणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, तीन जागांपैकी एक संधी पर्वती विधानसभा मतदारसंघाला, तर दोन संधी खडकवासला विधानसभा मतदारसंघाला मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मात्र, याबाबत अधिकृत घोषणा झालेली नाही.

आठवड्यामध्ये तीन नावे निश्चित झाल्यानंतर ती पुणे महानगरपालिकेकडे पाठविण्यात येणार असून, त्यानंतर महापालिकेकडून संबंधित नामनिर्देशित सदस्यांच्या नावांची अधिकृत घोषणा केली जाणार आहे. त्यामुळे २० पात्र उमेदवारांपैकी कोणाच्या नावावर शिक्कामोर्तब होते, याकडे आता सिंहगड रोड परिसरासह राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे

### दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर एकता ग्रुपची मिरवणूक रद्द

- महाप्रसादासह वृद्धाश्रमाला मदत




बार्शी (आरंभ पर्व) : बार्शी तालुक्यात निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीची गंभीरता लक्षात घेऊन एकता ग्रुपने यंदाची मिरवणूक रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. मिरवणुकीवर होणारा खर्च टाळून त्याऐवजी समस्त गावकऱ्यांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच या उपक्रमातून वृद्धाश्रमासही आर्थिक मदत देण्यात येणार आहे. सन २०१४ पासून सामाजिक, सांस्कृतिक आणि विधायक उपक्रम राबविणाऱ्या एकता ग्रुपने यंदा उत्सवापेक्षा सामाजिक बांधिलकीला प्राधान्य देत एक वेगळाच आदर्श निर्माण केला आहे. सध्या बार्शी तालुक्यातील शेतकरी दुष्काळाच्या गंभीर परिस्थितीचा सामना करत असताना मिरवणुकीवर मोठ्या प्रमाणात खर्च करण्याऐवजी तो निधी समाजोपयोगी कार्यासाठी वापरण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या मंडळाच्या मिरवणुकीची समस्त बार्शी तालुक्यामध्ये चर्चा होत असते त्याच मंडळांनी यावर्षी दुष्काळजन्य परिस्थितीमुळे मिरवणूक रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबत एकता ग्रुपचे संस्थापक तथा माजी सरपंच बाळराजे गाटे म्हणाले, "बार्शी तालुक्यात सध्या दुष्काळाची भयंकर परिस्थिती असून शेतकरी मोठ्या संकटात आहे. अशा परिस्थितीत मिरवणुकीवर खर्च करणे उचित ठरणार नाही. उत्सव साजरा करताना सामाजिक संवेदनशीलता जपणे आवश्यक आहे. त्यामुळे मिरवणूक रद्द करून महाप्रसादाचे आयोजन करण्याबरोबरच वृद्धाश्रमास मदत करण्याचा निर्णय घेतला आहे. उत्सवातून विधायक कार्य घडावे, हाच आमचा प्रयत्न आहे." २५ सप्टेंबर रोजी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून, या उपक्रमात समस्त ग्रामस्थांनी सहभागी व्हावे, असे आवाहन एकता ग्रुपच्या वतीने करण्यात आले आहे. दुष्काळाच्या काळात अनावश्यक खर्चाला फाटा देत समाजोपयोगी उपक्रमांना प्राधान्य देण्याचा एकता ग्रुपचा हा निर्णय निश्चितच सामाजिक बांधिलकीचा वेगळा आदर्श ठरत आहे.

### तुळजाभवानी माता पलंगाची जुन्नरला मिरवणूक

जुन्नर (आरंभ पर्व) : श्री तुळजा भवानीमातेच्या श्रमनिद्रेसाठी तुळजापूर येथे जाणाऱ्या मातेच्या पलंगाचे शनिवार दि. १९ रोजी पलंगाचे आगमन झाले. तुळजाभवानी मातेच्या जयघोषात आणि वाजत-गाजत उत्साही वातावरणात पलंगाचे स्वागत करण्यात आले. मातेच्या पलंग आणि पालखीची शहरातून वाजत गाजत मिरवणूक काढण्यात आली. मातेच्या पासोड्याचे पूजन करण्यात आले. पलंगावर गादीची, तसेच तुळजाभवानी मातेची विधिवत स्थापना करण्यात आली. घोडेगाव (ता. आंबेगाव) येथून श्री तुळजाभवानी मातेचा पलंग परंपरेने जुन्नरला येत असतो. येथील तिळवण तेली समाज कार्यालयात पलंगाचे सुमारे दहा दिवस वास्तव्य असते. घोडेगाव ते तुळजापूर प्रवासात सर्वाधिक दिवस पलंगाचे वास्तव्य जुन्नर येथे असते. पलंगाच्या दर्शनासाठी विविध ठिकाणाहून मोठ्या संख्येने भाविक येत असतात.

# जीवघेण्या हृदयविकारातून १५ वर्षीय मुलीची सुखरूप सुटका

**पुणे (दै. आरंभ पर्व)**



संशयित फुलमिनंट व्हायरल मायोकार्डायटिसमुळे गंभीर कार्डिओजेनिक शॉकमध्ये गेलेल्या १५ वर्षीय मुलीला DPU सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, पिंपरी येथील डॉक्टरांनी वेळेवर केलेल्या VA-ECMO उपचारामुळे जीवदान मिळाले. गंभीर अवस्थेत असलेल्या या मुलीवर आठ दिवस ECMO उपचार करण्यात आले. त्यानंतर तिच्या हृदयाच्या कार्यक्षमतेत हळूहळू सुधारणा झाली.

या मुलीला २७ ऑगस्ट रोजी सुरुवातीला अशक्तपणा, त्यानंतर चक्कर आणि उलट्या होण्यास सुरुवात झाली. प्रकृती अस्वस्थ असतानाही तिने नियोजित परीक्षा दिली. मात्र त्यानंतर तिची प्रकृती झपाट्याने खालावली आणि तिला रिफ्रॅक्टरी कार्डिओजेनिक शॉक निर्माण झाला. परिस्थिती गंभीर होत असल्याने DPUच्या ECMO पथकाला तातडीने पाचारण करण्यात आले. कार्डियाक तज्ज्ञांसह पथक संबंधित रुग्णालयात पोहोचले. रुग्णाची प्रकृती सातत्याने खालावत असल्याने DPUमध्ये हलवण्यापूर्वीच रिट्रीव्हल प्रक्रियेदरम्यान ECMO सपोर्ट सुरू करण्यात आला. रुग्णाला आठ दिवस ECMO सपोर्ट देण्यात आला. या काळात तिच्या हृदयाच्या कार्यक्षमतेत हळूहळू सुधारणा होत गेली. त्यामुळे ECMO सपोर्ट क्रमाक्रमाने कमी करण्यात आला.

४ सप्टेंबर रोजी रुग्णाला यशस्वीरित्या ECMO सपोर्टमधून बाहेर काढण्यात आले आणि डिकॅन्युलेशन करण्यात आले. त्यानंतर तिला व्हेंटिलेटरवरूनही बाहेर काढण्यात आले. जवळपास तीन आठवड्यांच्या उपचार आणि पुनर्वसनानंतर १५ सप्टेंबर रोजी तिला रुग्णालयातून घरी सोडण्यात आले. डिस्चार्जच्या वेळी तिची हिमोडायनामिक आणि न्यूरोलॉजिकल स्थिती स्थिर होती. रुग्णावर डॉ. प्राची साठे, डॉ. असिर तांबोळी आणि डॉ. रिद्धी कुंडू यांच्या नेतृत्वाखाली उपचार करण्यात आले. तसेच CVTS पथकातील डॉ. महेश, डॉ. आशिष डोलस आणि डॉ. आशिष बाविस्कर यांचे सहकार्य लाभले. अचानक अशक्तपणा, चक्कर आणि उलट्यांपासून सुरू झालेली प्रकृती काही तासांतच जीवघेण्या हृदयविकाराच्या स्थितीत पोहोचली. मात्र वेळेवर केलेले वैद्यकीय मूल्यांकन, तातडीने सुरू केलेला VA-ECMO उपचार आणि विविध वैद्यकीय पथकांमधील समन्वय यामुळे या मुलीला गंभीर अवस्थेतून बाहेर काढण्यात यश आले. डॉ. भाग्यश्री पी. पाटील, प्र-कुलपती, डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ, यांनी या उपचाराचे कौतुक करताना प्रगत आणि समन्वयित आरोग्यसेवेचे महत्त्व अधोरेखित केले. तर डॉ. रेखा आर्कोट, अधिष्ठाता, डॉ. डी. वाय. पाटील वैद्यकीय महाविद्यालय, रुग्णालय आणि संशोधन केंद्र यांनी अशा गंभीर परिस्थितीत तातडीने घेतलेले वैद्यकीय निर्णय आणि बहुवैद्यकीय पथकाचे टीमवर्क निर्णायक ठरत असल्याचे सांगितले. डॉ. प्राची साठे यांनी ECMO उपचारासाठी केवळ यंत्रणा नव्हे, तर प्रशिक्षित आणि समन्वयित संपूर्ण वैद्यकीय पथक आवश्यक असल्याचे स्पष्ट केले.

### हृदयाला मिळाला उपचारासाठी वेळ

DPUमध्ये दाखल झाल्यानंतर रुग्णाची स्थिती अत्यंत गंभीर होती. पारंपरिक औषधोपचारांनी अपेक्षित सुधारणा होत नसल्याने वैद्यकीय पथकाने तातडीने VA-ECMO सुरू केले. या उपचारामुळे हृदयाची पंपिंग क्षमता अत्यंत कमी झालेल्या अवस्थेत शरीरातील महत्त्वाच्या अवयवांपर्यंत रक्तप्रवाह आणि ऑक्सिजन पुरवठा टिकवून ठेवण्यास मदत झाली.

### बहुवैद्यकीय पथकाचे

या उपचारामध्ये अतिदक्षता उपचार तज्ज्ञ, हृदयरोग तज्ज्ञ, कार्डियाक सर्जन, कार्डियाक ॲनेस्थेशियोलॉजिस्ट, ECMO तज्ज्ञ, परफ्युजनिस्ट, नर्सिंग, श्वसन उपचार आणि पुनर्वसन पथकांनी समन्वयाने काम केले.

# उपमहापौर परशुराम वाडेकर यांच्या प्रमुख गणेश मंडळांना भेटी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**



गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पुण्याचे उपमहापौर परशुराम वाडेकर यांनी शहरातील प्रमुख गणेश मंडळांना भेटी देऊन उत्सवाच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या व्यवस्थेचा आणि सुविधांचा आढावा घेतला. त्यांनी मानाचा पाचवा गणपती केसरीवाडा, श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती, श्रीमंत भाऊसाहेब रंगारी मंडळ, अखिल मंडई मंडळ आणि साने गुरुजी मंडळांना भेट देत मंडळांच्या पदाधिकाऱ्यांशी संवाद साधला. गणेशोत्सवासाठी पुण्यात राज्याच्या विविध भागांसह देशभरातून मोठ्या संख्येने भाविक दाखल होतात. भाविकांची वाढती संख्या लक्षात घेऊन महापालिकेच्या वतीने करण्यात आलेल्या सुविधा व उपाययोजनांची माहिती वाडेकर यांनी घेतली. भाविकांची सुरक्षितता, वाहतूक व्यवस्था, स्वच्छता, पिण्याचे पाणी आणि इतर नागरी सुविधांबाबत प्रशासनाच्या नियोजनाचाही त्यांनी आढावा घेतला.

# स्वच्छ वर्ग-सुंदर वर्ग स्पर्धेतून विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेचा संस्कार

**पुणे (दै. आरंभ पर्व)**



शिक्षणाचा दैनंदिन जीवनात उपयोग व्हावा, विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेबाबत जाणीव-जागृती निर्माण व्हावी आणि स्वच्छतेचा वसा आजन्म जपण्याचा संस्कार बालमनावर रुजावा, या उद्देशाने कै. नारायणराव नवले प्रा. विद्यालय, मनपा शाळा क्र. २०४ बी येथील इयत्ता चौथीच्या वर्गात 'स्वच्छ वर्ग-सुंदर वर्ग' स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमांतर्गत ऑगस्ट महिन्यातील विजेत्या विद्यार्थ्यांना आज बक्षिसे देऊन गौरविण्यात आले.

याबाबत माहिती देताना वर्गशिक्षिका सौ. श्रद्धा नाडकर्णी यांनी सांगितले की, इयत्ता चौथीच्या 'आपल्या सभोवतालचे जग' या विषयातील 'स्वच्छ माझा परिसर' या पाठातून विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे महत्त्व आणि विविध पैलू समजावून सांगण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनीच उत्स्फूर्तपणे, "मॅडम, आपणही आपल्या वर्गात स्वच्छ वर्ग-सुंदर वर्ग स्पर्धा सुरू करूया," अशी कल्पना मांडली. विद्यार्थ्यांच्या या कल्पनेतून या उपक्रमाची सुरुवात झाली.

विशेष म्हणजे, विद्यार्थ्यांनी संपूर्ण महिनाभर वर्ग स्वच्छ ठेवत या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. वर्ग अस्वच्छ होऊ नये, यासाठी विद्यार्थ्यांनी स्वतःहून काळजी घेतली. त्यांच्या या प्रयत्नांचे कौतुक करत ठरल्याप्रमाणे आज सर्व विद्यार्थ्यांना बक्षिसे देण्यात आली. स्वच्छतेचे महत्त्व समजून घेण्याबरोबरच स्वतःच्या आणि इतरांच्या कष्टांची जाणीव विद्यार्थ्यांना व्हावी, या उद्देशाने विद्यार्थ्यांच्या सर्वानुमते हा उपक्रम संपूर्ण वर्षभर सुरू ठेवण्यात येणार असल्याचे सौ. श्रद्धा नाडकर्णी यांनी सांगितले. पर्यावरणाचे भान आणि स्वच्छतेची सवय बालवयातच रुजविणाऱ्या या उपक्रमाचे मुख्याध्यापिका सौ. सविता मानकर, इयत्ता चौथीचे सहशिक्षक सूर्यवंशी सर, हजारे सर, तसेच शाळेतील सर्व शिक्षकांनी कौतुक केले. प्रभागाच्या नगरसेविका तथा शिक्षण व वृक्ष संवर्धन समितीच्या सदस्या सौ. कोमलताई नवले यांनीही विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत उपक्रमाला शुभेच्छा दिल्या.

'स्वच्छ वर्ग-सुंदर वर्ग' या उपक्रमातून स्वच्छतेची शिकवण केवळ पाठ्यपुस्तकापुरती मर्यादित न राहता विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष कृतीत उतरल्याचे चित्र यावेळी पाहायला मिळाले.

# AIMS इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीजमध्ये 'प्रारंभ २०२६' इंडक्शन कार्यक्रम उत्साहात

## नवीन विद्यार्थ्यांना व्यवस्थापन शिक्षणासोबत नेतृत्व, सकारात्मक दृष्टिकोन आणि व्यक्तिमत्त्व विकासाचे मार्गदर्शन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**




"आजच्या काळात केवळ नोकरी मिळवणे महत्त्वाचे नसून, मिळालेली नोकरी टिकवणे आणि त्यामध्ये सातत्याने प्रगती करणे अधिक महत्त्वाचे आहे. विद्यार्थ्यांना केवळ पदवी देण्यापेक्षा त्यांना प्रत्यक्ष क्षेत्रातील अनुभव आणि व्यावहारिक ज्ञानावर आधारित शिक्षण देणे ही शैक्षणिक संस्थांची जबाबदारी आहे. चुका करण्यास घाबरू नका; मात्र प्रत्येक चुकीतून शिकत राहा आणि बदलत्या काळानुसार नवनवीन गोष्टी आत्मसात करा," असा सल्ला AIMS इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीजचे चेअरमन डॉ. मनीष सिन्हा यांनी विद्यार्थ्यांना दिला. कृष्णा एज्युकेशनल ट्रस्टच्या AIMS इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीजच्या २०२६-२८ या बॅचसाठी 'प्रारंभ २०२६' या इंडक्शन कार्यक्रमाचे आयोजन सोमवार, दि. २१ सप्टेंबर रोजी येवलेवाडी कॅम्पस येथे करण्यात आले. यावेळी डॉ. मनीष सिन्हा विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत होते. कार्यक्रमास निवृत्त लेफ्टनंट कर्नल समीर कुलकर्णी, मानसशास्त्रज्ञ बोल्लमपल्ली सत्यप्रकाश यांच्यासह संस्थेचे प्राध्यापक, विद्यार्थी आणि पालक उपस्थित होते.

'प्रारंभ २०२६' या उपक्रमाच्या माध्यमातून नव्या विद्यार्थ्यांना AIMSच्या शैक्षणिक वातावरणाशी परिचित करून देतानाच त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला आणि भविष्यातील व्यावसायिक वाटचालीला सकारात्मक दिशा देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांचे स्वागत, संस्थेची वाटचाल, व्यवस्थापन शिक्षणाची ओळख, नेतृत्वगुणांचा विकास तसेच व्यक्तिमत्त्व विकासासाठी विविध मार्गदर्शनपर आणि प्रेरणादायी सत्रांचे आयोजन करण्यात आले आहे. ही सत्रे दि. ३ ऑक्टोबरपर्यंत आयोजित करण्यात येणार आहेत.

डॉ. मनीष सिन्हा यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना व्यवस्थापन शिक्षणासोबतच नेतृत्वगुण, शिस्त, आत्मविश्वास, सकारात्मक दृष्टिकोन आणि बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेण्याची क्षमता विकसित करण्याचे महत्त्व अधोरेखित केले. व्यावसायिक क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी केवळ शैक्षणिक ज्ञान पुरेसे नसून प्रत्यक्ष अनुभव, सातत्याने शिकण्याची वृत्ती आणि योग्य दृष्टिकोन आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

निवृत्त लेफ्टनंट कर्नल समीर कुलकर्णी यांनी 'Born to Win' या विषयावर प्रेरणादायी मार्गदर्शनपर सत्र घेतले. ध्येय निश्चिती, आत्मविश्वास, आव्हानांना सामोरे जाण्याची वृत्ती, सकारात्मक विचारसरणी आणि यशासाठी आवश्यक मानसिकता याबाबत त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

दुपारच्या सत्रात मानसशास्त्रज्ञ व ग्राफॉलॉजिस्ट आणि स्वाक्षरी विश्लेषक बोल्लमपल्ली सत्यप्रकाश यांनी विद्यार्थ्यांना विशेष मार्गदर्शन केले. व्यक्तिमत्त्व आणि स्वभाव समजून घेण्यासाठी ग्राफॉलॉजी व स्वाक्षरी विश्लेषणातील विविध पैलू त्यांनी विद्यार्थ्यांसमोर मांडले. 'प्रारंभ २०२६'च्या माध्यमातून नव्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक अभ्यासक्रमाबरोबरच नेतृत्व, आत्मविश्वास, व्यक्तिमत्त्व विकास, व्यावसायिक कौशल्ये आणि सकारात्मक दृष्टिकोन यांची जोड देण्याचा संस्थेचा प्रयत्न आहे. नव्या विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल शैक्षणिक आणि व्यावसायिक भवितव्यासाठी विविध उपक्रम व मार्गदर्शनपर सत्रे या इंडक्शन कार्यक्रमाच्या माध्यमातून राबविण्यात येत आहेत.

दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
मंगळवार, दि. २२ सप्टेंबर २०२६






## थोडक्यात पण महत्वाचे



## सिंबायोसिस येथे 'माहेरवाशीण' उपक्रमाचा शुभारंभ

• "सुरक्षित मातृत्व ही केवळ आरोग्याची बाब नसून सामाजिक जबाबदारी" – उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार

पुणे (आरंभ पर्व) : सिंबायोसिस विद्यापीठ रुग्णालय व संशोधन केंद्र आणि सिंबायोसिस वैद्यकीय महिला महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने माहेरवाशीण – मातृत्व सेवेची नवी संकल्पना' या अभिनव उपक्रमाचा शुभारंभ आज लवळे, पुणे येथे उत्साहात झाला. या प्रसंगी गर्भवती मातांसाठी तयार करण्यात आलेल्या 'माहेरवाशीण' माहिती पुस्तिकेचे प्रकाशन महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या हस्ते आमदार श्री. शंकर मांडेकर यांच्या उपस्थितीत करण्यात आले. यावेळी सिंबायोसिस आंतरराष्ट्रीय अभिमत विद्यापीठाच्या कुलपती डॉ. विद्या येरवडेकर, कुलगुरू डॉ. आर. रमण, डॉ. राजीव येरवडेकर, प्रोव्होस्ट, वैद्यकीय व आरोग्य विज्ञान विद्याशाखा, सिंबायोसिस आंतरराष्ट्रीय विद्यापीठ तसेच सिंबायोसिस चे संस्थापक व अध्यक्ष प्रा. (डॉ.) शां. ब. मुजुमदार आदी मान्यवर उपस्थित होते. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी आपल्या भाषणात सुरक्षित मातृत्व ही केवळ आरोग्य व्यवस्थेची जबाबदारी नसून संपूर्ण समाजाची सामूहिक जबाबदारी आहे, असे प्रतिपादन केले. मातेला सुरक्षित, सन्मानपूर्वक आणि आपुलकीची प्रसूतीसेवा मिळणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले. वैद्यकीय उपचारांसोबतच मातेला मानसिक आधार, सन्मान आणि विश्वासाची भावना देणे गरजेचे आहे, असेही त्यांनी नमूद केले.



## प्रीमियम नेत्रसेवा सुविधांचा विस्तार

पुणे (आरंभ पर्व) : पुण्यातील नेत्रसेवा क्षेत्रातील आघाडीचे आकाश आय क्लिनिक अँड लेझर सेंटरने झाइस इंडियाच्या सहकार्याने फिनिक्स मार्केटसिटी येथे झाइस व्हिजन सेंटर बाय आकाश आय सुरू केले आहे. या केंद्राच्या उद्घाटनामुळे पुण्यातील झाइस व्हिजन सेंटरची संख्या चार झाली असून, नेत्रसेवा किरकोळ विक्री केंद्राच्या माध्यमातून सुरू करण्यात आलेले हे शहरातील पहिले झाइस व्हिजन सेंटर आहे. पुण्यात २५ वर्षांहून अधिक काळ नेत्रसेवा क्षेत्रात कार्यरत असलेल्या आकाश आय क्लिनिक अँड लेझर सेंटरने सुरू केलेल्या या केंद्रात झाइसच्या अचूक प्रकाशिकी तंत्रज्ञानासह प्रगत दृष्टीसेवा उपाय आणि आकाश आयची नेत्रसेवेतील तज्ज्ञता एकत्रित करण्यात आली आहे. ग्राहकांच्या दृष्टीविषयक गरजा, जीवनशैली आणि दैनंदिन वापर लक्षात घेऊन वैयक्तिक सल्लामसलत आणि योग्य दृष्टीसेवा उपाय उपलब्ध करून देण्यावर केंद्राचा भर आहे. फिनिक्स मार्केटसिटीमधील जी२३, तळमजला, बोसजवळ आणि युनिक्लोसमोर, फिनिक्स अव्हेन्यू ऑफ स्टार्स, पुणे-नगर रोड, विमान नगर येथे सुमारे १,८०० चौरस फुटांच्या जागेत हे केंद्र उभारण्यात आले आहे. आधुनिक आणि दर्जेदार वातावरणात ग्राहकांना दृष्टीसेवेचा अनुभव मिळावा, या दृष्टीने केंद्राची रचना करण्यात आली आहे. या केंद्राच्या उद्घाटनाबाबत आकाश आय क्लिनिक अँड लेझर सेंटरचे मालक डॉ. विठ्ठल सातव म्हणाले, "झाइसच्या प्रगत दृष्टीसेवा तंत्रज्ञानाला आमच्या नेत्रसेवेतील अनुभवाची जोड देऊन ग्राहकांना अधिक चांगला आणि वैयक्तिक अनुभव देण्याचा आमचा प्रयत्न आहे. पुण्यातील ग्राहकांच्या बदलत्या दृष्टीविषयक गरजा लक्षात घेऊन या केंद्राची उभारणी करण्यात आली आहे."

## गणेशोत्सवात, छेडा'स ची नवी मोदक रेंजही पुणेकरांचं वेधून घेते लक्ष

पुणे (आरंभ पर्व) : गणेशोत्सवामुळे सध्या पुण्याच्या रस्त्यांवर उत्साहाचं वातावरण आहे. याच उत्सवी माहोलात छेडा'स ची नवी मोदक रेंजही पुणेकरांचं लक्ष वेधून घेत आहे. हा उपक्रम छेडा'स च्या पॅकेज्ड मिठाईच्या रेंजचा विस्तार करण्याच्या दिशेने आहे. गणेशोत्सवासाठी तयार केलेल्या या रेंजमध्ये २१ पीसचा केशर मोदक पॅक आणि ११ पीसचा असॉर्टेड मोदक पॅक आहे. असॉर्टेड पॅकमध्ये मलाई, केसर आणि गुलाब हे फ्लेवर्स आहेत. गणपतीचा नैवेद्य, कुटुंबासोबत वाटण्यासाठी किंवा सणानिमित्त भेट देण्यासाठी ही रेंज तयार करण्यात आली आहे. यंदा छेडा'स ने मोदकांची ही रेंज केवळ स्टोअर्सपुरती मर्यादित न ठेवता थेट पुण्याच्या रस्त्यांवर आणली आहे. इलेक्ट्रिक बसेसवरील फुल-रॅप ब्रँडिंगमुळे शहराच्या विविध भागांतून प्रवास करणाऱ्या पुणेकरांना ही रेंज सहज नजरेस पडत आहे. बस स्टॉप्स आणि प्रमुख आउटडोअर ठिकाणांवरील ब्रँडिंगमुळे या उपक्रमाला आणखी मोठी दृश्यमानता मिळत आहे. पुण्यातील हा उपक्रम छेडा'स च्या महाराष्ट्रभर सुरू असलेल्या गणेशोत्सव मोहिमेचा भाग आहे. मुंबईत ब्रँड पहिल्यांदाच लालबागचा राजा उत्सवाशी जोडला गेला आहे. जुहू येथे उभारण्यात आलेले मोदकाच्या बॉक्सचे उघडणे आणि बंद होणे दाखवणारे आकर्षक कायनेटिक आउटडोअर देखील सध्या लक्ष वेधून घेत आहे. नाशिकमध्येही छेडा'स ने नाशिकचा राजा उत्सवाशी पहिल्यांदाच जोडत आपल्या गणेशोत्सवातील उपस्थितीचा विस्तार केला आहे. पुण्यातील या उपक्रमातून छेडा'स ने मोदकांना दुकानाच्या शेल्फपलीकडे थेट शहराच्या रस्त्यांवर आणलं आहे यंदाच्या गणेशोत्सवात छेडा'स चे मोदक अक्षरशः शहरभर फिरत आहेत.

## महारेराचा 'अॅक्वारा बिल्डर्स'ला दणका



पुणे (आरंभ पर्व) : वडगाव बुद्रुक येथील 'अॅक्वारा प्राइड' या गृहप्रकल्पातील सदनिकांचा ताबा देण्यास झालेल्या विलंबाप्रकरणी महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरणाने (महारेरा) अॅक्वारा बिल्डर अँड डेव्हलपर प्रा. लि.ला चार सदनिकाधारकांना विलंबाचे व्याज देण्याचे आदेश दिले आहेत. महारेरा सदस्य महेश पाठक यांनी नुकताच हा आदेश दिला. 'अॅक्वारा प्राइड' प्रकल्पाची महारेरा नोंदणी क्रमांक P52100031863 असून, सी विंगमधील ४०६, ५०५, ५०९ आणि ५११ क्रमांकाच्या सदनिकांशी संबंधित चार तक्रारी महारेराकडे दाखल करण्यात आल्या होत्या. संबंधित करारांनुसार सदनिकांचा ताबा ६ सप्टेंबर २०२५ रोजी देणे अपेक्षित होते. मात्र, मुदत उलटूनही ताबा मिळाला नसल्याने सदनिकाधारकांनी ताब्यासह व्याज, भरपाई आणि खर्चाची मागणी केली होती. प्रकल्पाला विलंब होण्यामागे नैसर्गिक वायू व बांधकाम साहित्याची टंचाई, पुरवठा साखळीतील अडथळे, मनुष्यबळाची कमतरता तसेच युद्धजन्य परिस्थितीचा परिणाम झाल्याचा दावा विकासकाने केला. प्रकल्पाची मुदत ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत वाढविण्यात आल्याचेही विकासकाने सांगितले होते. दरम्यान, महारेराच्या आदेश क्रमांक ६६/२०२६नुसार संबंधित प्रकल्पाला चार महिन्यांची मुदतवाढ लागू असल्याचे प्राधिकरणाने नमूद केले.

# एस. एस. नगरकर ज्वेलर्सच्या भव्य दालनाचे बाणेरमध्ये उद्घाटन

## पुण्यातील चौथे दालन; 'राजवाडा'मध्ये ग्राहकांना मिळणार पारंपरिक व दुर्मिळ डिझाईन्सचे दागिने

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

मागील ७५ वर्षांपासून पुणेकरांच्या पसंतीस उतरलेल्या एस. एस. नगरकर ज्वेलर्सच्या पाचव्या दालनाचे आज (२० सप्टेंबर) रविवारी बाणेरमध्ये उद्घाटन करण्यात आले. बाणेर-म्हाळुंगे रोडवर असलेल्या या दालनामुळे लगतच्या परीसरातील ग्राहकांना आता नगरकर ज्वेलर्सच्या वैशिष्ट्यपूर्ण दागिन्यांची खरेदी करता येणार आहे.



उद्घाटनाप्रसंगी वसंत नगरकर, स्वाती वल्लभ नगरकर, वासंती वसंत नगरकर, प्रसाद नगरकर, पुष्कर नगरकर, प्रियांका नगरकर, अनघा नगरकर, पूजा नगरकर कुलकर्णी, रोहन कुलकर्णी, कुहू नगरकर उपस्थित होते. कायनेटीक ग्रुपच्या संचालिका जयश्री फिरोदिया, उद्योजक जगदीश कदम व मोहना कदम, एम. बी. पाटील व संगिता पाटील या नगरकर ज्वेलर्सच्या मान्यवर ग्राहकांच्या हस्ते दालनाचे उद्घाटन करण्यात आले. सामाजिकतेचे भान राखत नगरकर ज्वेलर्सकडून तीन सामाजिक संस्थांना प्रत्येकी एक लाखाची अर्थिक मदत करण्यात आली. यामध्ये कर्णबधिर मुलांच्या पुर्नवसनासाठी कार्यरत सुहृद फाऊंडेशन, वंचित घटकांसाठी काम करणारी वंचित विकास व सोलापूर येथील संस्कार संजीवन या संस्थांचा समावेश आहे. सुहृद फाऊंडेशनच्या अनुराधा पाथरफोड व गौरी लेले, वंचित विकासचे विजयकुमार मर्लेचा, देवयानी गोंगले व मिनाक्षी नवले, संस्कार संजीवन फाऊंडेशनचे परमेश्वर काळे व संदिप तिरकुंडे यांनी धनादेश स्वीकारला.

जयश्री फिरोदिया यांनी दालनाच्या भव्यतेचे तसेच दागिन्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण घडणावळींचे कौतुक केले. नगरकर परिवाराने परंपरेचा साजाला उत्कृष्टतेची जोड देत आपली वेगळी ओळख निर्माण केल्याचे त्यांनी नमूद केले. जगदीश कदम यांनीही नगरकर ज्वेलर्सचे कौतुक करताना व्यवसायासोबतच सामाजिकतेचे भान जपणारे हे कुटुंब असल्याचा विशेष उल्लेख केला. सात दशकांपूर्वी सुरू झालेल्या या व्यवसायाला वल्लभ आणि वसंत नगरकर यांच्यानंतर नवी पिढी जोमाने पुढे नेत आहे. ग्राहकांच्या समाधानाला प्राधान्य देणाऱ्या नगरकर ज्वेलर्सचा विस्तार देशभर व्हावा, अशी आशा त्यांनी यावेळी व्यक्त केली.

वसंत नगरकर म्हणाले, "श्रीपाद नगरकर यांनी १९५२ मध्ये श्रीपाद शंकर नगरकर ज्वेलर्सची मुहूर्तमेढ रोवली. आता नगरकरांची तिसरी पिढी प्रसाद आणि पुष्कर या अँटिक, युनिक दागिन्यांची परंपरा पुण्यासह राज्यातील इतर शहरांत घेऊन जाण्यासाठी मेहनत करत आहेत. हा परंपरागत व्यवसाय असून पारंपरिक आणि शुद्ध दागिने ही आमची खासियत आहे. शहराचा झपाट्याने विस्तार होत असताना ग्राहकांना आपण राहत असलेल्या ठिकाणी खरेदी करणे सोपे व्हावे यादृष्टीने बाणेरमध्ये शाखा सुरू करत आहोत."

प्रसाद नगरकर म्हणाले, "नगरकर ज्वेलर्सचा येत्या काळात पुण्यासह इतर जिल्ह्यांमध्ये विस्तार करण्याचा आमचे नियोजन आहे. पारंपरिक दागिन्यांसोबतच आर्या कलेक्शनमध्ये विविध प्रकारचे दागिने उपलब्ध होणार आहेत. याशिवाय काही वर्षांपूर्वीच सुरू केलेल्या राजवाडा या विशेष संकल्पनेअंतर्गत एलिट क्लासचे दागिने घडवण्यात येतात, यात एक डिझाईन एकदाच घडवले जाते व ते एक्स्लुझिव्ह असते. हे राजवाडा दालन खरेदीसाठीच नाही तर पाहण्यासाठीही अतिशय आकर्षक अशी रचना असलेले आहे."

> या दालनात सोने, चांदी, हिरे, पोल्की यातील नाविन्यपूर्ण दागिने येथे आहेत. पारंपरिक दागिने, बकुळी, पोहे हार, ठुशी, श्रीमंत हार, कोल्हापुरी साज, वज्र टीका, चंद्रहार, मोत्यांचे दागिने, फ्युजन डिझाईनचे कुंदन नेकलेस, गेरू नेकलेस, नकास वर्क, मोती कुंदन, गहू तोड्याचे नेकलेस राणी व लक्ष्मीहार अशा असंख्य दागिन्यांची गुंफण येथे असणार आहे. याशिवाय चांदीचे देवघर, देवदेवतांच्या मुर्ती, सोफासेट असे दुर्मिळ प्रकारही ग्राहकांना उपलब्ध होतील, असेही नगरकर यांनी सांगितले.

> पुष्कर नगरकर म्हणाले, "पुण्यातील तुळशीबाग, लक्ष्मी रोड, कोथरुड आणि ठाणे येथील ग्राहकांना दिलेल्या विश्वासार्ह आणि दर्जेदार सेवेनंतर आता बाणेर येथे नवीन दालन सुरू झाले आहे. नाविन्यपूर्ण दागिन्यांची पर्वणी उपलब्ध करून देताना आम्हाला आनंद होत आहे. सोने, चांदी, हिरे यातील पारंपरिक आणि फ्युजन दागिन्यांचे असंख्य प्रकार आपल्याकडे आहेत. कमी वजनापासून ते जास्त वजनापर्यंतचे सर्व दागिने येथे मिळणार आहेत."

## गर्भावस्थेत गंभीर हृदयविकाराचे निदान; प्राण वाचवण्यात यश

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

मणिपाल हॉस्पिटल, बाणेर येथील डॉक्टरांनी हृदयविकाराचा कोणताही पूर्वइतिहास नसलेल्या ३१ वर्षीय महिलेच्या गर्भावस्थेदरम्यान गंभीर हृदयविकाराचे निदान करून तिच्यावर यशस्वी उपचार केले. गर्भावस्थेच्या ३४व्या आठवड्यात तिला सौम्य स्वरूपाचा श्वास लागणे, हृदयाची धडधड वाढणे आणि अस्वस्थता जाणवू लागली. सुरुवातीला ही लक्षणे गर्भावस्थेच्या शेवटच्या टप्प्यातील सामान्य बदलांशी संबंधित असावीत असे वाटत असले, तरी लक्षणांमध्ये झालेला बदल लक्षात घेऊन पुढील तपासण्या करण्यात आल्या. तपासणीत तिच्या हृदयाची कार्यक्षमता गंभीररीत्या कमी झाल्याचे आढळले. हृदयाची रक्त पंप करण्याची क्षमता दर्शविणारे लेफ्ट व्हेंट्रिक्युलर इजेक्शन फ्रॅक्शन (LVEF) अवघे २४ टक्के होते. तिची प्रकृती लक्षात घेऊन तिला रुग्णालयात दाखल करण्यात आले आणि कार्डिओलॉजी, स्त्रीरोग व प्रसूती, क्रिटिकल केअर आणि कार्डियाक अॅनेस्थेशिया तज्ज्ञांच्या समन्वयाने उपचार सुरू करण्यात आले. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन सी-सेक्शनद्वारे प्रसूती करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानंतर महिलेने २.६ किलो वजनाच्या निरोगी मुलीला जन्म दिला. पेरिपार्टम कार्डिओमायोपॅथी हा गर्भावस्थेच्या शेवटच्या काळात किंवा प्रसूतीनंतर उद्भवणारा दुर्मिळ हृदयविकार आहे.

## शिक्षकांसाठी व्यावसायिक मानकांवर कार्यशाळा संपन्न

**पुणे (दै. आरंभ पर्व)**




राष्ट्रीय व्यावसायिक मानकांविषयी शिक्षकांमध्ये जागरूकता निर्माण करणे आणि बदलत्या शैक्षणिक वातावरणात त्यांची क्षमता वाढवणे या उद्देशाने, १० आणि ११ सप्टेंबर रोजी पुण्यातील महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेच्या (एससीईआरटी) कॅम्पसमध्ये एका राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत महाराष्ट्रभरातील जिल्हा शिक्षण आणि प्रशिक्षण संस्थांमधील (डीआयईटी) शिक्षक एकत्र आले होते. कार्यशाळेत एससीईआरटी महाराष्ट्रच्या जॉइंट डायरेक्टर डॉ. कमलादेवी आवटे, एससीईआरटी महाराष्ट्रच्या डेप्युटी डायरेक्टर (प्री-सर्व्हिस डिपार्टमेंट) अरुणा यादव, एससीईआरटी महाराष्ट्रचे असिस्टंट डायरेक्टर (प्री-सर्विस डिपार्टमेंट) बालकृष्ण वाटरकर तथा स्टरलाइट एडइंडिया फाउंडेशनचे हेड डॉ. एंटनी नेलिसरी उपस्थित होते. ही कार्यशाळा स्टरलाइट एडइंडिया फाउंडेशनच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आली होती, जी व्यावसायिक विकास, संस्थात्मक बळकटीकरण आणि डेटा-आधारित निर्णयप्रक्रियेद्वारे भारताची सार्वजनिक शिक्षण प्रणाली मजबूत करण्यासाठी कार्य करते. या कार्यक्रमाने सहभागींना एनपीएसटी (NPST) आराखडा आणि राष्ट्रीय मानके शिक्षक क्षमता, निरंतर व्यावसायिक विकास, मार्गदर्शन, मूल्यांकन आणि करिअरमधील प्रगती यांच्याशी कशी संबंधित आहेत हे समजून घेण्याची संधी दिली. या कार्यशाळेत सहभागींना एनपीएसटी (NPST) आराखड्याचा उद्देश, रचना आणि प्रमुख घटकांविषयी माहिती देण्यात आली. राष्ट्रीय शिक्षण धोरण (NEP) २०२० अंतर्गत शिक्षकांना त्यांच्या क्षमतांची समज सुधारण्यासाठी आणि व्यावसायिक विकासाची व्यापक उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी व्यावसायिक मानके किती महत्त्वपूर्ण आहेत, यावर चर्चेत लक्ष केंद्रित करण्यात आले. कार्यशाळेचे संचालन करणाऱ्या डॉ. कमलादेवी आवटे म्हणाल्या, "राष्ट्रीय व्यावसायिक मानके शिक्षकांना अध्यापनाचा दर्जा आणि व्यावसायिकता सुधारण्यासाठी एक आवश्यक चौकट प्रदान करतात. यांसारख्या कार्यशाळा डीआयईटीच्या प्राध्यापकांना या मानकांबद्दल एक समान समज विकसित करण्याची आणि शिक्षक शिक्षण व व्यावसायिक विकासातील त्यांच्या महत्त्वावर चिंतन करण्याची संधी देतात. शैक्षणिक संस्थांमध्ये जागरूकता आणि ज्ञान वाढवणे हे व्यावसायिक मानकांशी अर्थपूर्ण संलग्नतेच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल आहे."

# पुरंदरच्या राजकारणात महिला नेतृत्वाची नवी चाहूल

## सार्वजनिक उपक्रम, महिला मेळावे आणि जनसंपर्कातून राजकीय सक्रियता वाढली; आगामी समीकरणांबाबत चर्चेला वेग

**सासवड-प्रतिक गंगणे (दै. आरंभ पर्व)**


ममता शिवतारे


राजवर्धिनी जगताप


रूपाली झेंडे


प्राजक्ता दुर्गाडे

पुरंदर विधानसभा मतदार संघातील राजकीय घडामोडींमध्ये महिला नेतृत्वाची वाढती सक्रियता सध्या चर्चेचा विषय ठरत आहे. आरोग्य शिबिरे, महिला मेळावे, सामाजिक उपक्रम, विविध सार्वजनिक कार्यक्रम तसेच नागरिकांशी थेट संवाद साधण्याच्या माध्यमातून काही महिला राजकीय क्षेत्रात आपली उपस्थिती अधिक ठळक करताना दिसत आहेत. त्यामुळे पुरंदरच्या आगामी राजकारणात महिला नेतृत्वाला कितपत महत्त्वाची भूमिका मिळणार, याबाबत स्थानिक राजकीय वर्तुळात विविध चर्चा सुरू झाल्या आहेत. शिवसेनेचे विद्यमान आमदार विजय शिवतारे यांच्या कन्या डॉ. ममता शिवतारे, भाजपचे माजी आमदार संजय जगताप यांच्या पत्नी राजवर्धिनी जगताप, राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाच्या जिल्हा परिषद सदस्य रूपाली अमोल झेंडे तसेच याच गटाचे नेते दिगंबर दुर्गाडे यांच्या कन्या आणि जिल्हा परिषद सदस्य डॉ. प्राजक्ता दिगंबर दुर्गाडे यांच्या विविध सामाजिक आणि सार्वजनिक उपक्रमांमधील सहभागाकडे राजकीय निरीक्षकांचे लक्ष लागले आहे.

गेल्या काही काळात महिला मेळावे, आरोग्यविषयक उपक्रम, सामाजिक कार्यक्रम आणि नागरिकांच्या भेटीगाठी यामधून या महिला नेत्यांचा जनसंपर्क वाढताना दिसत आहे. स्थानिक पातळीवरील या हालचालींमुळे त्यांच्या राजकीय भूमिकेबाबत उत्सुकता निर्माण झाली असली, तरी या सक्रियतेचा थेट संबंध आगामी विधानसभा उमेदवारीशी जोडणे सध्या घाईचे ठरणार आहे.

रूपाली झेंडे आणि डॉ. प्राजक्ता दुर्गाडे या दोघी पुणे जिल्हा परिषदेच्या सदस्य असून, पुरंदर तालुक्यातील गराडे आणि नीरा शिवतक्रार या जिल्हा परिषद गटांचे प्रतिनिधित्व करीत आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून राजकारणात सक्रिय झालेल्या या नेतृत्वाला भविष्यात व्यापक राजकीय संधी मिळतात का, याकडेही लक्ष दिले जात आहे. दरम्यान, पुरंदर विधानसभा मतदारसंघ महिलांसाठी आरक्षित होणार असल्याची चर्चा काही ठिकाणी होत असली, तरी त्याबाबत सध्या कोणतीही अधिकृत घोषणा झालेली नाही. पुणे जिल्हा प्रशासनाच्या २०२६च्या नोंदीमध्ये पुरंदर विधानसभा मतदारसंघ क्रमांक २०२ म्हणून नमूद करण्यात आला आहे. त्यामुळे सध्याच्या महिला नेतृत्वाच्या सक्रियतेकडे केवळ संभाव्य आरक्षणाच्या दृष्टिकोनातून पाहण्याऐवजी स्थानिक राजकारणात महिलांचा वाढता सहभाग या व्यापक संदर्भात पाहणे आवश्यक आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमधून अनेक महिला राजकीय प्रक्रियेत पुढे आल्या आहेत. २०२६च्या जिल्हा परिषद निवडणुकीत रूपाली झेंडे आणि डॉ. प्राजक्ता दुर्गाडे यांनी विजय मिळविल्याने त्यांचे स्थानिक राजकारणातील प्रतिनिधित्व अधिक बळकट झाले आहे. यापूर्वीही पुरंदर तालुक्यात ग्रामपंचायत स्तरावर महिला आरक्षणामुळे मोठ्या संख्येने महिलांना राजकीय नेतृत्वाची संधी मिळाली होती.

> स्थानिक स्वराज्य संस्थांमधून तयार झालेले हे महिला नेतृत्व भविष्यात विधानसभा राजकारणात कितपत विस्तारते, याचे चित्र अद्याप स्पष्ट झालेले नाही. सध्या कोणत्याही महिला नेत्याची पुरंदर विधानसभा मतदारसंघासाठी उमेदवारी अधिकृतपणे निश्चित झालेली नाही. तसेच मतदारसंघ महिलांसाठी आरक्षित झाल्याचीही अधिकृत माहिती उपलब्ध नाही. त्यामुळे सध्याच्या घडामोडींकडे सार्वजनिक कार्यक्रमांतील सहभाग, जनसंपर्क वाढविण्याचे प्रयत्न आणि सामाजिक उपक्रमांमधील सक्रियता या मर्यादित चौकटीत पाहणे अधिक योग्य ठरणार आहे. आगामी काळात पक्षांकडून या महिला नेत्यांना कोणत्या जबाबदाऱ्या दिल्या जातात, त्यांची राजकीय सक्रियता कोणत्या दिशेने जाते आणि पुरंदरच्या राजकारणातील त्यांचा प्रभाव कशा पद्धतीने विकसित होतो, यावर पुढील राजकीय समीकरणांचे चित्र अवलंबून राहणार आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



### एथर एनर्जीची संस्थांशी भागीदारी

नवी दिल्ली (आरंभ पर्व) : भारतातील अग्रगण्य इलेक्ट्रिक दोन-चाकी उत्पादकांपैकी एक असलेल्या एथर एनर्जीने आज छत्रपती संभाजीनगरमधील चार शैक्षणिक आणि कौशल्य-विकास संस्थांसोबत सामंजस्य करार केले. या उपक्रमाचा उद्देश इलेक्ट्रिक वाहन आणि मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्रासाठी प्रदेशातील टॅलेंट पाइपलाइन मजबूत करणे आहे. सामंजस्य करार आंतरराष्ट्रीय सेंटर ऑफ एक्सलन्स इन इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट, आयएसआयईइंडिया प्रायव्हेट लिमिटेड, यशोदीप नॉलेज हब आणि जिजामाता आयटीआय, शेवगाव यांच्यासोबत करण्यात आले. एथरने प्रदेशात ऑरिक येथे नवीन सुविधा उभारून आपला मॅन्युफॅक्चरिंग विस्तार सुरू केला आहे. या उपक्रमाचा उद्देश त्या सुविधेला आणि त्याभोवतीच्या औद्योगिक इकोसिस्टमला आधार देण्यासाठी आवश्यक कुशल वर्कफोर्स तयार करणे आहे. सामंजस्य करार अंतर्गत एथर या चार संस्थांसोबत ईव्ही-केंद्रित अभ्यासक्रम डिझाइन, फॅकल्टी डेव्हलपमेंट, तांत्रिक प्रशिक्षण आणि इंडस्ट्री-लिंक्ड प्रॅक्टिकल लर्निंगवर काम करेल. विद्यार्थी आणि फॅकल्टी यांना एथरच्या तांत्रिक आणि उत्पादन टीम्ससोबत काम करून ईव्ही टेक्नॉलॉजीज आणि आधुनिक उत्पादन पद्धतींचा अनुभव मिळेल. यात उदयोन्मुख ईव्ही टेक्नॉलॉजीज, मॅन्युफॅक्चरिंग प्रोसेसेस, सेफ्टी आणि क्वालिटी प्रॅक्टिसेस यांचा समावेश असेल.




### गणेशोत्सवानिमित्त शिवशाही प्रतिष्ठानचे रक्तदान शिबिर

- ६५ रक्तदात्यांनी केले रक्तदान; सामाजिक बांधिलकीचा दिला संदेश

उरुळी कांचन (आरंभ पर्व) : गणेशोत्सवाच्या उत्साहाला सामाजिक बांधिलकीची जोड देत शिवशाही प्रतिष्ठानच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. विश्वराज हॉस्पिटलच्या सहकार्याने आयोजित या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी तब्बल ६५ रक्तदात्यांनी रक्तदान करून गरजू रुग्णांसाठी मोलाचे योगदान दिले. रक्ताची गरज असलेल्या रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध व्हावे आणि समाजात रक्तदानाबाबत जनजागृती व्हावी, या उद्देशाने शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. 'रक्तदान हेच जीवनदान' या भावनेतून अनेकांनी प्रथमच रक्तदान केले, तर नियमित रक्तदात्यांनीही सहभाग नोंदवून इतरांना रक्तदानासाठी प्रोत्साहित केले. विश्वराज हॉस्पिटलच्या वैद्यकीय पथकाने रक्तदात्यांची आवश्यक तपासणी करून सुरक्षित पद्धतीने रक्तसंकलन केले. रक्तदानापूर्वी तसेच रक्तदानानंतर रक्तदात्यांना आवश्यक मार्गदर्शन करण्यात आले. स्वयंसेवकांच्या सहकार्याने शिबिराचे शिस्तबद्ध नियोजन करण्यात आले. गणेशोत्सवाच्या माध्यमातून धार्मिक उपक्रमांसोबतच सामाजिक कार्यालाही प्राधान्य देण्याचा संदेश या रक्तदान शिबिरातून देण्यात आला. रक्तदानासारखा समाजोपयोगी उपक्रम राबविल्याबद्दल उपस्थितांनी शिवशाही प्रतिष्ठानच्या कार्याचे कौतुक केले.




### प्रा. डॉ. संजय चोरडिया यांचा राष्ट्रीय उत्कृष्टता पुरस्काराने गौरव

पुणे (आरंभ पर्व) : सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया आणि सूर्यभारत इंडस्ट्रियल रिसर्च ज्ञानपीठाच्या (एसबीआयआरडी) उल्लेखनीय कार्याचा महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांच्या हस्ते राष्ट्रीय उत्कृष्टता पुरस्काराने गौरव करण्यात आला. मुंबईतील यशवंतराव चव्हाण सेंटर येथे मैत्री पीस फाउंडेशनतर्फे आयोजित 'नॅशनल एक्सलन्स अवॉर्ड्स' सोहळ्यात हा सन्मान प्रदान करण्यात आला. शैक्षणिक उत्कृष्टता, राष्ट्रनिर्मिती, नाविन्यपूर्ण संशोधन, उद्योजकता आणि उद्योग विकासातील योगदानाची दखल घेत प्रा. डॉ. चोरडिया यांना 'डिस्टिंग्युश्ड लॉरिट फॉर एज्युकेशनल एक्सलन्स, नेशन बिल्डिंग' हा विशेष सन्मान देण्यात आला. यावेळी सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनच्या उपाध्यक्षा सुषमा चोरडिया यांनी एसबीआयआरडीच्या वतीने पुरस्कार स्वीकारला. या सन्मानाबद्दल सूर्यदत्त समूहातील विद्यार्थी, प्राध्यापक आणि कर्मचाऱ्यांनी प्रा. डॉ. संजय चोरडिया व सुषमा चोरडिया यांचे अभिनंदन केले.

### ए-वन स्टील्स इंडिया लिमिटेडचा आयपीओ २४ सप्टेंबर रोजी खुला होणार

पुणे (आरंभ पर्व) : बंगळुरूमध्ये मुख्यालय असलेली आणि पोलाद उत्पादनाच्या सर्व टप्प्यांवर कार्यरत असलेल्या ए-वन स्टील्स इंडिया लिमिटेडतर्फे ('एएसआयएल') कंपनीचा प्रारंभिक समभाग विक्री प्रस्ताव ('आयपीओ') गुरुवार, 24 सप्टेंबर 2026 रोजी सबस्क्रिप्शनसाठी खुला होणार असल्याची घोषणा करण्यात आली आहे. अँकर गुंतवणूकदारांसाठी बोली लावण्याची तारीख बुधवार, 23 सप्टेंबर 2026 असून, हा इश्यू सोमवार, 28 सप्टेंबर 2026 रोजी बंद होणार आहे. फ्रेश इश्यूच्या माध्यमातून कंपनी ₹35,500 लाखांचा निधी उभारणार असून, कंपनीचे शेअर्स बीएसई आणि एनएसईवर सूचीबद्ध करण्याचे उद्दिष्ट आहे. ऑफरसाठी प्रति शेअर ₹385 ते ₹405 असा प्राइस बँड निश्चित करण्यात आला आहे.

# डीपीजीयूमध्ये करिअर एक्स्पो २०२६चे आयोजन




डॉ. रोहिणी एस. पाटील, चीफ ऑपरेटिंग ऑफिसर, ज्ञान प्रसाद ग्लोबल युनिव्हर्सिटी (DPGU), डॉ. डी. वाय. पाटील ग्रुप, पुणे, म्हणाल्या, "करिअर एक्स्पोसारखे उपक्रम हे आमच्या संस्थेच्या उद्योगाभिमुख शिक्षणाच्या दृष्टिकोनाचे प्रतिबिंब आहेत. केवळ वर्गातील शिक्षण पुरेसे नसून विद्यार्थ्यांना उद्योगविश्वाशी थेट संवाद साधण्याची आणि प्रत्यक्ष संधी अनुभवण्याची आवश्यकता आहे. २० हून अधिक कंपन्या आणि शेकडो विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग ही आमच्यासाठी सकारात्मक बाब आहे. विद्यार्थ्यांना उद्योगासाठी सज्ज आणि भविष्यातील आव्हानांसाठी सक्षम करण्यासाठी अशा उपक्रमांचे आयोजन यापुढेही सातत्याने केले जाईल."

**पिंपरी, पुणे (दै. आरंभ पर्व)**

डॉ. डी. वाय. पाटील ग्रुप, पुणे यांच्या ज्ञान प्रसाद ग्लोबल युनिव्हर्सिटी (DPGU) आणि डॉ. डी. वाय. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी यांच्या संयुक्त विद्यमाने पिंपरी येथील कॅम्पसमध्ये 'करिअर एक्स्पो २०२६'चे आयोजन करण्यात आले. या उपक्रमात २० हून अधिक नामांकित कंपन्या सहभागी झाल्याने विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रांतील रोजगाराच्या संधी आणि उद्योगविश्वाच्या अपेक्षा समजून घेण्यासाठी एकाच व्यासपीठावर संधी मिळाली. इंजिनीअरिंग, मॅनेजमेंट, फार्मसी, लॉ, एज्युकेशन, नर्सिंग, आर्ट्स, कॉमर्स आणि सायन्स अशा विविध शाखांमधील विद्यार्थ्यांनी एक्स्पोला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. सकाळी ८ वाजता रिबन कटिंग सोहळ्याने एक्स्पोची सुरुवात झाली. विद्यापीठ व संस्थेचे वरिष्ठ अधिकारी, प्राध्यापक, कर्मचारी आणि मान्यवरांच्या उपस्थितीत या उपक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. नोंदणीद्वारे विद्यार्थ्यांना एक्स्पोमध्ये सहभागी होता आले. विविध कंपन्यांच्या प्रतिनिधींशी थेट संवाद साधत विद्यार्थ्यांनी उपलब्ध पदे, आवश्यक कौशल्ये, भरती प्रक्रिया आणि उद्योगाच्या अपेक्षांबाबत माहिती घेतली. अनेक विद्यार्थ्यांना थेट मुलाखती आणि करिअरविषयक संवादाची संधी मिळाली. विद्यार्थ्यांचा मोठा सहभाग आणि उत्साह यामुळे कॅम्पसमध्ये दिवसभर करिअरविषयक सकारात्मक वातावरण निर्माण झाले. यावेळी बोलताना डॉ. सोमनाथ पी. पाटील, प्रो-चॅन्सलर, ज्ञान प्रसाद ग्लोबल युनिव्हर्सिटी (DPGU), डॉ. डी. वाय. पाटील ग्रुप, पुणे, म्हणाले, "विद्यार्थ्यांनी केवळ पदवी घेऊन बाहेर पडू नये, तर त्यांच्या भविष्यासाठी स्पष्ट दिशा आणि आत्मविश्वास असावा, हा आमचा सातत्याने प्रयत्न आहे. करिअर एक्स्पो हा त्याच दिशेने टाकलेले महत्त्वाचे पाऊल आहे. विद्यार्थी आणि उद्योगविश्वाला एका व्यासपीठावर आणल्यामुळे शैक्षणिक ज्ञान आणि प्रत्यक्ष उद्योगाच्या अपेक्षांमधील दरी कमी करण्यास मदत होते. विद्यार्थ्यांनी दाखवलेला उत्साह पाहून आनंद झाला असून, या एक्स्पोमधून अनेक विद्यार्थ्यांना निश्चितच चांगल्या संधी मिळतील, असा विश्वास आहे." एक्स्पोच्या यशस्वी आयोजनासाठी प्राध्यापक, प्लेसमेंट समन्वयक आणि कर्मचाऱ्यांनी कंपन्यांच्या प्रतिनिधींशी समन्वय साधत नोंदणीपासून मुलाखती आणि विद्यार्थ्यांच्या संवादापर्यंत संपूर्ण प्रक्रियेचे व्यवस्थापन केले. करिअर एक्स्पो २०२६च्या माध्यमातून ज्ञान प्रसाद ग्लोबल युनिव्हर्सिटी आणि डॉ. डी. वाय. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी यांनी उद्योगाशी जोडलेले शिक्षण, रोजगाराभिमुख कौशल्यविकास आणि विद्यार्थ्यांना सक्षम प्लेसमेंट सपोर्ट देण्याच्या आपल्या वचनबद्धतेला अधोरेखित केले आहे.

## भोरगिरी-भीमाशंकर वनभ्रमंतीतून पर्यावरणसंवर्धनाची शिकवण

**राजगुरूनगर (दै. आरंभ पर्व)**

राजगुरूनगर येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील भूगोल व मराठी विभागाच्या वतीने भोरगिरी ते भीमाशंकर वनसचेतन शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात ५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. जंगलभ्रमंतीदरम्यान विद्यार्थ्यांनी परिसरातील जैवविविधता, वनसंपदा आणि निसर्गसौंदर्याचा अनुभव घेतला.



भूगोल विभागप्रमुख डॉ. दिलीप मुळूक व प्रा. मच्छिंद्र मुळूक यांनी विद्यार्थ्यांना विविध झाडे, वनस्पती, शेकरू तसेच ब्ल्यू मॉर्मनसह अनेक फुलपाखरांची ओळख करून दिली. या प्रत्यक्ष निरीक्षणातून विद्यार्थ्यांना वनस्पती व प्राणिजीवनातील परस्परसंबंध समजले. जैवविविधतेचे संवर्धन आणि जंगलाचे संरक्षण करण्याची गरज त्यांच्या लक्षात आली. निसर्गातील प्रत्येक घटकाचे महत्त्व जाणून घेत विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाविषयी आस्था निर्माण झाली. भीमाशंकर परिसरात प्लास्टिक कचरा संकलित करणाऱ्या वनविभागातील महिला कर्मचाऱ्यांशी विद्यार्थ्यांनी संवाद साधला. या संवादातून विद्यार्थ्यांना पर्यावरणसंवर्धन, स्वच्छता आणि निसर्गरक्षणाचे महत्त्व समजले.निसर्गघटकांचे प्रत्यक्ष निरीक्षण करून विद्यार्थ्यांमध्ये निसर्गाविषयी जिज्ञासा निर्माण करणे आणि पर्यावरणसंवर्धनाची जाणीव दृढ करणे, हा शिबिराचा उद्देश होता.

शिबिराचे आयोजन प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, भूगोल विभागप्रमुख डॉ. दिलीप मुळूक, प्रा. मच्छिंद्र मुळूक आणि प्रा. वैभवी कोपर्डे यांनी केले.

## औषध सुरक्षा कायदा, रुग्णालयीन बिलांचे ऑडिट करा

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

औषधांच्या किमतीतील पारदर्शकता, रुग्णालयीन बिलांचे शासकीय लेखापरीक्षण आणि रुग्णांच्या आर्थिक हक्कांच्या संरक्षणासाठी स्वतंत्र यंत्रणा उभारावी, अशी मागणी रुग्ण हक्क परिषदेचे संस्थापक अध्यक्ष उमेश चव्हाण यांनी पत्रकार परिषदेत केली. तीन महिन्यांच्या मुदतीत औषध सुरक्षा कायदा लागू झाला नाही, तर तीव्र स्वरूपाचे राज्यव्यापी आंदोलन छेडण्याचा इशाराही त्यांनी दिला. यावेळी रुग्ण हक्क परिषदेचे केंद्रीय सचिव डॉ. स्वानंद पंडित, पुणे शहर अध्यक्ष अपर्णा मारणे-साठ्ये, महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष अशोक शिंदे आदी उपस्थित होते. उमेश चव्हाण म्हणाले, "रुग्णालयातील वाढता उपचार खर्च, महागडी औषधे तसेच विविध शुल्कांमुळे अनेक कुटुंबांवर आर्थिक संकट ओढवत आहे. अनेकदा रुग्णालयांकडून आपल्याच रुग्णालयातील फार्मसीमधून औषधे खरेदी करण्याची सक्ती केली जाते. या औषधांची किंमत खूप जास्त असल्याने रुग्णाच्या नातेवाईकांवर आर्थिक ताण येतो.

## २० बाय २० फुटांच्या रांगोळीतून पंतप्रधान नरेंद्र मोदींना शुभेच्छा

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७६ व्या वाढदिवसानिमित्त रविवार पेठेतील संत नामदेव चौकात २० फूट बाय २० फूट आकाराची भव्य रांगोळी काढून त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. लोककल्याण प्रतिष्ठान, प्रल्हाद गवळी मित्र परिवार आणि भाजप पुणे शहर यांच्या वतीने आयोजित या उपक्रमात ७६ दिवे पेटवून आणि ७६ किलो पेढ्यांचे वाटप करून वाढदिवसाचा आनंदोत्सव साजरा करण्यात आला. रविवार पेठेतील संत नामदेव चौकात काढण्यात आलेल्या भव्य रांगोळीने नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. रांगोळीच्या माध्यमातून



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. या उपक्रमामुळे परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. नागरिकांनी रांगोळीचे कौतुक करत उपक्रमाला प्रतिसाद दिला. ही रांगोळी पाच दिवस पुणेकरांना पाहता येणार आहे. "वाढदिवसाच्या निमित्ताने २० फूट बाय २० फूट आकाराची रांगोळी काढून आनंदोत्सव साजरा केला.

## विश्वविहार सोसायटीत गणेशोत्सवानिमित्त चित्रकला स्पर्धा उत्साहात

### बाल व किशोरवयीन मुलांचा उत्स्फूर्त सहभाग; तीन गटांतील विजेत्यांची निवड

**आंबेगाव, पुणे (दै. आरंभ पर्व)**

आंबेगाव येथील विश्वविहार सोसायटी गणेश मंडळाच्या वतीने गणेशोत्सवानिमित्त बाल व किशोरवयीन मुलांसाठी चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेला सोसायटीतील मुलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विविध वयोगटातील मुलांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवत आपल्या कल्पनाशक्तीला आणि कलागुणांना चित्रांच्या माध्यमातून सुंदर अभिव्यक्ती दिली. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मुलांमधील कलागुणांना प्रोत्साहन मिळावे, त्यांना आपली सर्जनशीलता दाखविण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध व्हावे तसेच उत्सवाच्या माध्यमातून सांस्कृतिक वातावरण निर्माण व्हावे,



या उद्देशाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सहभागी मुलांनी विविध विषयांवर आकर्षक आणि कल्पक चित्रे साकारली. स्पर्धेसाठी सहभागी विद्यार्थ्यांचे बालगट, मध्यम गट आणि मोठा गट अशा तीन गटांमध्ये विभाजन करण्यात आले होते. प्रत्येक गटातील उत्कृष्ट चित्रांची निवड करून विजेत्यांची घोषणा करण्यात आली. बालगटात श्रीशा पडवळ, मध्यम गटात रिधीमा निंबाळकर, तर मोठ्या गटात दुर्गा बंजारा यांनी प्रथम क्रमांक पटकावला. विजेत्या विद्यार्थिनींचे मंडळाच्या वतीने अभिनंदन करण्यात आले. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी राजाराम भिस्ते, विजय बनकर, तेजस पाचोरे, संतोष सुतार आणि प्रशांत आवटी यांनी विशेष परिश्रम घेतले. मुलांना प्रोत्साहन देण्यासाठी तसेच स्पर्धेचे नियोजन व्यवस्थित पार पाडण्यासाठी कार्यकर्त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. गणेशोत्सवाच्या माध्यमातून धार्मिक कार्यक्रमांसोबतच सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांना चालना देण्याचा विश्वविहार सोसायटी गणेश मंडळाचा हा उपक्रम परिसरात कौतुकाचा विषय ठरला. मुलांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे स्पर्धेला विशेष रंगत आली असून, पालकांनीही मंडळाच्या या उपक्रमाचे कौतुक केले.

# शिवभक्तांच्या पाठपुराव्याला यश

- तानाजी मालुसरे यांचे चित्र हटविले
- सिंहगड रोड परिसरातील अस्वच्छतेमुळे ऐतिहासिक चित्र हटविण्याची मागणी
- शिववंदना ग्रुप व जगदंब प्रतिष्ठानचा पाठपुरावा




ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वांच्या स्मृतीस्थळांचा आणि चित्रांचा सन्मान राखताना त्यांची योग्य देखभाल, परिसराची स्वच्छता आणि नागरिकांची जबाबदारीही महत्त्वाची असल्याचे या घटनेतून अधोरेखित झाले आहे.
**- शिववंदना ग्रुप व जगदंब प्रतिष्ठान, सिंहगड रोड, पुणे शहर**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सिंहगड रोड परिसरातील ईशान्य हॉटेलसमोरील भिंतीवर नरवीर सुभेदार तानाजी मालुसरे व मावळ्यांचे रेखाटण्यात आलेले चित्र परिसरातील अस्वच्छतेमुळे चर्चेत आले होते. या चित्राजवळ नागरिकांकडून कचरा टाकला जात असल्याने तसेच अस्वच्छता होत असल्याने शिवभक्तांनी नाराजी व्यक्त केली होती. अखेर शिवभक्तांच्या पाठपुराव्यानंतर २० सप्टेंबर रोजी हे चित्र हटविण्यात आले. २८ जून रोजी नरवीर तानाजी मालुसरे पथ परिसरातील भिंतीवर तानाजी मालुसरे व मावळ्यांचे चित्र रेखाटण्यात आले होते. मात्र, कालांतराने चित्राच्या परिसरात कचरा टाकला जात असल्याचे आणि अस्वच्छता होत असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वांचे चित्र असलेल्या ठिकाणी अशा प्रकारची अस्वच्छता होत असल्याने शिवभक्तांच्या भावना दुखावल्याचे सांगण्यात आले. या प्रकरणी नागरिक व शिवभक्तांनी शिववंदना ग्रुपकडे तक्रारी केल्या. त्यानंतर ग्रुपच्या सदस्यांनी संबंधित ठेकेदारांकडे विचारणा करून परिसरातील परिस्थितीबाबत जाब विचारला. हे काम नगरसेवकांच्या माध्यमातून करण्यात आल्याचे त्यांना सांगण्यात आले.

त्यानंतर शिववंदना ग्रुपच्या वतीने संबंधित काम थांबविण्यासह परिसराची स्वच्छता करण्याची मागणी करण्यात आली. संबंधित नगरसेवकांनाही याबाबत माहिती देण्यात आली. मात्र, अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्याने शिववंदना ग्रुप आणि जगदंब प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांनी कायदेशीर मार्गाने पाठपुरावा करण्याचा तसेच आंदोलन करण्याचा निर्णय घेतला.

रोहित (पपू माळी), अक्षय हळंदे, गणेश पाटील, निलेश काळे, अक्षय मांजरेकर, दौलत साळुंखे यांच्यासह इतर शिवभक्तांनी या प्रकरणी पाठपुरावा केला. दरम्यान, संबंधित नगरसेवकांच्या निदर्शनास प्रकरणाची गंभीरता आल्यानंतर २० सप्टेंबर रोजी नरवीर सुभेदार तानाजी मालुसरे व मावळ्यांचे चित्र हटविण्यात आले.



## नांदेड सिटीतील आरोग्य शिबिरामध्ये ४०० जणांची तपासणी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

गणेश उत्सवानिमित्त नांदेड सिटी रेसिडेन्शिअल डॉक्टर्स असोसिएशन आणि रामराज्य ज्येष्ठ नागरिक संघ, नांदेड सिटी यांच्या संयुक्त विद्यमाने नांदेड सिटी येथील अँफीथिएटर (गणेश मंडप) येथे भव्य निःशुल्क आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराचा नांदेड सिटी, पुणे आणि परिसरातील ४०० हून अधिक नागरिकांनी लाभ घेतला. शिबिराचे उद्घाटन आमदार भीमराव तापकीर, नगरसेवक काकासाहेब चव्हाण, नगरसेवक सुभाष नाण्हेकर, नांदेड सिटी डॉक्टर्स असोसिएशनचे अध्यक्ष व नेत्रतज्ज्ञ डॉ. अनिल दुधभाते आणि रामराज्य ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष शिरीष पाटील यांच्या उपस्थितीत झाले. यावेळी नांदेड सिटीतील विविध संस्था, सोसायट्या, सामाजिक क्षेत्रातील मान्यवर तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिबिरात विविध वैद्यकीय शाखांमधील ४० हून अधिक तज्ज्ञ डॉक्टरांनी नागरिकांची तपासणी केली. सामान्य आरोग्य तपासणीसह अस्थिरोग, नेत्ररोग, त्वचारोग, मानसोपचार, स्त्रीरोग, आयुर्वेद, दंतचिकित्सा, होमिओपॅथी, कान-नाक-घसा, बालरोग, फिजिओथेरपी आणि आहारविषयक मार्गदर्शनाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. याशिवाय रक्तदाब, रक्तातील साखर, हाडांची घनता तसेच विविध रक्त तपासण्याही करण्यात आल्या.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.